# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**

**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२२३१०४**


जावक क्रमांक : गों.वि./आस्था/६७९/२०१५ दिनांक : ०५.०५.२०१५

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

विधानमंडळ कामकाज/तातडीचे

**विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. १५०२७**
**महाविद्यालयीन प्राध्यापकांना त्यांनी केलेल्या असहाकार आंदोलनाच्या कालावधीतील ७१ दिवसांचे वेतन मिळण्याबाबत...**

संदर्भ :- १. मा. अवर सचिव, यांचे पत्र क्र. वि.स.प्र. २०१५/ प्र.क्र. १९५ /२०१५ विशि-१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक १८ एप्रिल, २०१५
२. विद्यापीठाचे पत्र क्र. गो.वि./कुलसका/१०१२/२०१३ दिनांक १५.०२.२०१३
३. विद्यापीठाची अधिसुचना क्र. गों.वि./१०११/२०१३ दिनांक १५.०२.२०१३

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेच्या आदेशानुसार दिनांक ०४.०२.२०१३ ते दिनांक १०.०५.२०१३ या कालावधीत महाराष्ट्रातील महाविद्यालयीन प्राध्यापकांचे परीक्षेसंबंधात कामावर असहकार आंदोलन सुरु केले होते. संदर्भीय पत्र क्रमांक ०२ व ०३ नुसार विद्यापीठामार्फत सर्व महाविद्यालयांना या आंदोलनात सहभागी होणाऱ्या प्राध्यापकांची यादी पाठविण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु अद्यापपावेतो संदर्भीय पत्र क्रमांक ०२ व ०३ बाबत माहिती विद्यापीठास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

संदर्भीय पत्र क्रमांक ०१ नुसार सदर आंदोलनाबाबत विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. १५०२७ प्राप्त झालेले असून, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, सदर अतारांकित प्रश्न क्र. १५०२७ मधील मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ मधील माहिती **तात्काळ** विद्यापीठास registrar.gondwanauniversity@gmail.com वर पाठविण्यात यावी.

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

E:\Latters\Daily Latter 277

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. 867 दिनांक 30-4-15
जावक क्र. 335 दिनांक 2-8-15

महाराष्ट्र शासन

विधानमंडळ कामकाज/तातडीचे

ह तु. जाधव
अवर सचिव

अ.शा.पत्र क्रमांक: विसप्र २०१५/प्र.क्र.१९५/२०१५/वि.शि.-१,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : 28 एप्रिल, २०१५

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 2013 दि. 30/4/15
जावक क्र. ...... दि. ......

विषय : विधानसभा अतारांकीत प्रश्न क्र. १५०२७
**महाविद्यालयीन प्राध्यापकांना त्यांनी केलेल्या असहकार आंदोलनाच्या कालावधीतील ७१ दिवसांचे वेतन मिळण्याबाबत...**

महोदय,

श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), वि.प.स. यांनी यांनी विचारलेला विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. १५०२७ पुढील प्रमाणे आहे :-

१. महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेच्या आदेशानुसार दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक १० मे, २०१३ या कालावधीत महाराष्ट्रातील महाविद्यालयीन प्राध्यापकांचे परीक्षेसंबंधात कामावर असहकार आंदोलन सुरु होते, हे खरे आहे काय,

२. असल्यास, आंदोलनाच्या कालावधीत महाविद्यालयीन प्राध्यापकांनी अध्यापनाचे काम पूर्ण केले आहे काय, तसेच दैनिक हजेरी पत्रकावर सही केलेली आहे काय,

३. असल्यास, दिनांक १० मे, २०१३ रोजी परिक्षेच्या कामकाजावरील आंदोलन मागे घेतल्यानंतर परीक्षेसंबंधीचे काम महाविद्यालयीन प्राध्यापकांनी पूर्ण केले होते व दिनांक १० मे, २०१३ नंतर सर्व परिक्षेसंबंधिची कामे महाविद्यालयीन प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबाबतचे पत्र महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयीन कुलगुरुंनी शासनाला पाठविले होते, हे ही खरे आहे काय,

४. असल्यास, शासनाने उक्त कालावधीतील वेतन आजपावेतो संबंधित प्राध्यापकांना न देण्याची कारणे काय आहेत,

५. असल्यास, उक्त कालावधीत वेतन संबंधित वेतन संबंधित महाविद्यालयीन प्राध्यापकाना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्यानुषंगाने उपरोक्त प्राध्यापकांना उक्त कालावधीतील वेतन केंव्हापर्यंत मिळणे अपेक्षित आहे ?

विधानसभा कामकाजाचे गांभीर्य विचारात घेऊन उक्त अतारांकित प्रश्न क्र. **१५०२७** बाबतची माहिती kadam.t.vikas@gmail.com या ईमेल वर शासनास कृपया <u>उलटटपाली</u> पाठवावी, ही विनंती.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 801 दि. 2/5/2015
जावक क्र. ...... दि. ......

आपला स्नेहांकित,

(ह. तु. जाधव)

प्रति,

सर्व कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.